माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र.मुमाआ/नों.क्र.३०३२/२५/अ.क्र.६०४९/२५/०१

**डॉ. अविनाश मनोहरराव वारजूकर**
२०१, केशवकला अपार्टमेंट रहाटे कॉलनी वर्धा रोड,
नागपूर

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक (जनसंपर्क)**
**महारेल, मुंबई**
महाराष्ट्र रेल इन्फास्ट्रकचर डेव्हलपमेंट कॉमर्पोरेशन (महारेल), दुसरा मजला,
होचस्ट हाऊस, एनसीपीए रोड, नरिमन पॉईट, मुंबई-४०००२१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक (न्याय)**
**महारेल, मुंबई**
महाराष्ट्र रेल इन्फास्ट्रकचर डेव्हलपमेंट कॉमर्पोरेशन (महारेल), दुसरा मजला,
होचस्ट हाऊस, एनसीपीए रोड, नरिमन पॉईट, मुंबई-४०००२१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.१०.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.१४.१०.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक (जनसंपर्क) महारेल, श्री. विनीत टोके व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक (न्याय) महारेल श्री. अभिब्रत दास उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असे विशद केले की, महारेलची सविस्तर माहिती देण्यात आलेली नाही.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी डॉ. अविनाश वारजूकर, माजी राज्यमंत्री तथा माजी आमदार यांनी दि.११.०४.२०२५ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जावर आज सुनावणी घेण्यात येत असून अपिलार्थी व्यक्तिश: हजर असून विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक (जनसंपर्क) महारेल श्री. विनीत टोके तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक (न्याय) श्री. अभिब्रत दास हे हजर

असून उपरोक्त प्रकरणात आयोगाने दि.०५.०९.२०२५ रोजीच्या सुनावणी सुचनेनुसार खुलासा दाखल करण्यासाठी अधिक वेळ द्यावा, अशी विनंती केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी दि.१५.०२.२०२४ त्यानंतर दि.२३.०१.२०२५ रोजी महारेल यांच्या दाखल अर्जात महारेलची स्थापना तेथील व्यवस्थापकीय संचालक यांची नियुक्ती तसेच महारेलद्वारे मंजूर केलेल्या कामाची तांत्रिक व प्रशासकीय मंजुरीबाबत व एकंदरीतच महारेलच्या एकूण कार्यक्षेत्र, कार्यकक्षात केलेली विकास कामे यासंदर्भात एकूण १२ मुद्द्यांची माहिती मागितली. अपिलार्थी यांनी विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामुळे दि.२५.०२.२०२५ रोजी प्रथम अपिल अर्ज दाखल केला असून त्यावर कुठलीच सुनावणी घेण्यात न आल्यामुळे अपिलार्थी यांनी आयोगात द्वितीय अपील अर्ज दाखल केला. तसेच त्यांनी प्रत्यक्षात पाठपुरावा केला असता महारेल येथील अधिकाऱ्यांनी त्यांना माहिती अधिकार कायदा लागू होत नसल्याबाबत सुचित केले असल्याचा गंभीर आरोप देखील प्रस्तुत अर्जात केलेला आहे. त्यामुळेच मुख्यालयाच्यावतीने दि.१४.०८.२०२५ रोजी अपिलार्थी यांची दि.०६.०७.२०२५ रोजीच्या निवेदनावर माहिती अर्ज व प्रथम अपिल अर्जावर महारेल यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याविषयी सुचित करण्यात आले होते, असा कुठलाही अहवाल अद्याप सादर करण्यात आलेला नाही, ही बाब खेदजनक आहे.

आज झालेल्या सुनावणीत विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक यांनी महारेलला माहितीचा कायदा लागू होत असून त्याचे कटाक्षाने पालन केले जात असल्याबाबत स्पष्टपणे नमूद करीत व अपिलार्थी यांना कार्यालयातील कुठलेही अधिकारी अथवा कर्मचारी यांनी महारेलला माहिती अधिकार कायदा लागू होत नसल्याबाबत कथन केले असल्यास त्याबाबत दिलगिरी देखील व्यक्त केली आहे.

सादर केलेल्या जोडपत्र-अ चे निरीक्षण केले असल्यास त्यात विचारलेली बहुतांश माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम ४(१)(ख) अन्वये स्वयंप्रेरणेने उघड करणाऱ्या (suo moto disclosure) माहितीचा भाग असल्याचे प्रथम दर्शनी आढळून येते.

या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालय यांच्या **Kisan Chand Jain Vs. Union of India** मुळ याचिका (सिव्हील) क्र. ९९०/२०२१, यात सर्वच प्राधिकरणांची कलम ४(१)(ख) मधील नमुद १७ मुद्द्यांची माहिती स्वत:च्या सार्वजनिक संकेत स्थळावर उघड करण्याबाबत तसेच ती वेळोवेळी अद्यायावत करण्याबाबत स्वयंस्पष्ट सुचना दिली असून त्या सर्वच प्राधिकरणावर पूर्णत: बंधनकारक आहे. तसेच महाराष्ट्राचे विद्यमान मा.मुख्यमंत्री यांनीही प्रशासनाला दिलेल्या त्यांच्या पंचसुत्री निर्देशावर माहिती अधिकार कायद्याखाली देय असलेली सर्वच माहिती ही स्वत:हून संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याबाबत वेळोवेळी सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

१४.१०.२०२५

तसेच माहिती आयोगाच्यावतीने गेल्या अनेक वर्षापासून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम ४(१)(ख) ची माहिती ही उघड करण्याविषयी निर्देश जारी केले असून नुकत्याच दि.२९.०४.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम २५(५) अन्वये महाराष्ट्रातील सर्वच प्राधिकरणांना अशा प्रकारची माहिती उघड करण्याविषयी सविस्तर निर्देश देण्यात आले असून प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांच्या जोडपत्र-अ व ब यात मागितलेल्या माहितीचा विहित मुदतीत प्रतिसाद देण्यात आलेला नाहीच. मात्र अशाप्रकारची बहुतांश माहिती महारेल यांच्या संकेतस्थळावर पुर्णत: उपलब्ध नाही. यातील काही माहिती ही महारेल यांच्या संकेतस्थळावर अंशत: उपलब्ध असल्याविषयी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक (जनसंपर्क) महारेल यांनी नमूद केले असून अपिलार्थी यांचा जोडपत्र-अ कार्यालयास प्राप्त झाला तेव्हा कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे दोन्ही कंत्राटी तत्त्वावर असून आता कार्यरत नसून विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक (जनसंपर्क) महारेल व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक (न्याय) यांनी नुकताच कार्यभार स्वीकारला असल्याचे त्यांनी सुचित केले. ही बाब लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज हा अंशत: मंजुर करीत यातील मुद्दा क्र.१ ते १२ यातील कार्यालयीन अभिलेखात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम २(च) नुसार उपलब्ध असलेली व देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी श्री. वारजुकर यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम ७(६) अन्वये आदेश प्राप्त होताच २ आठवड्याच्या आत विनामूल्य प्रदान करावी, यातील जी माहिती सॉफ्ट कॉपी स्वरूपात उपलब्ध आहे, ती अपिलार्थी यांच्या भ्रमण दुरध्वनी अथवा ई-मेल वर पी.डी.एफ. स्वरुपात प्रदान करावी व यातील जी माहिती दस्ताऐवज स्वरुपात आहे त्याची छायांकित प्रत त्यावर माहिती अधिकार अधिनियम, २००५ खालील प्रदान केलेली माहिती या शिक्क्यासह व माहिती कायदा २००५ यांच्या लोगोसह विनामुल्य प्रदान करावी.

**प्रस्तुत प्रकरणी ज्या तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक (जनसंपर्क) महारेल यांनी विहित मुदतीत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम ७(१) अन्वये माहिती देणे अपेक्षित होते व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक (न्याय) यांनी यावर सुनावणी घेऊन समन्यायीक आदेश पारित करणे अपेक्षित होते. या दोन्ही व्यक्तीने महारेल येथील त्यांच्या सेवा समाप्त केल्या असून माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(८)(ग), कलम २०(१) व कलम २०(२) अन्वये नागरिकांच्या माहिती अधिकाराचे उल्लंघन झाल्याप्रकरणी नेमकी जबाबदारी कोणावर निश्चित करायची याबाबत संभ्रम निर्माण झाला असून कंत्राटी तत्वावर अधिकारी किंवा कर्मचारी यांनी संबंधित प्राधिकरणामधून राजीनामा दिल्यानंतर झालेला विलंब व त्यानंतर त्यावर माहिती अधिकार कायदा अंतर्गत ठोठावण्यात जाणारी शास्ती व शिस्तभंगाची शिफारस नेमकी**

कोणाविरुद्ध करावयची यात कोणतीही स्पष्टता नसल्यामुळे मा.अतिरिक्त मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र सरकार यांनी अशा प्रकारची सार्वजनिक प्राधिकरण अथवा विशेष प्राधिकरणामध्ये माहिती अधिकार कायदा सुयोग्यपणे राबविण्यासाठी सक्षम व पूर्णवेळ कार्यरत कर्मचाऱ्यांची यंत्रणा आखण्याबाबत दिशानिर्देश देणे आवश्यक असून सामान्य प्रशासन विभागाने त्या संदर्भात योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

तसेच प्रस्तुत प्रकरणी विद्यमान संचालक महारेल यांनी त्यांच्या कार्यालयातील माहिती अधिकार अधिनियमात योग्य प्रतिसाद दिला नसल्याबाबत गंभीर दखल घ्यावी. त्यावर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी तसेच अपिलार्थी जे माजी आमदार व राज्यमंत्री आहेत. त्यांनी केलेल्या माहिती अधिकार अर्जावर प्रतिसाद न देण्याच्या आरोपाची गंभीर दखल घेत महारेल येथील विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक (जनसंपर्क) महारेल व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक (न्याय) महारेल यांनी महारेलकडे प्राप्त माहितीच्या अधिकार अर्जाचे तपशील त्याला देण्यात आलेला प्रतिसाद याबाबतीत त्यांच्याकडे उपलब्ध असलेली नोंदणीवही (Register) ची छायांकित प्रत सचिव माहिती आयोग यांना वरील आदेश प्राप्त झाल्यानंतर २ आठवड्याच्या आत सादर करावा.

उपरोक्त आदेशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.
२. वरील अपील निकाली काढण्यात येत आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १४.१०.२०२५

( राहुल भा. पांडे )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

State Information Commission ★ Maharashtra ★